

सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण**
**एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,**
E-MAIL ID –lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७

---

**प्रेस नोट क्र.१२** **दिनांक २९.०५.२०२६**

## अनोळखी मृतदेहाची ओळख पटवुन खुनाचा गुन्हा उघडकीस आणुन ४८ तासात आरोपी अटक करण्यास ठाणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेस यश

----------------oooo-----------------

दिनांक २७/०५/२०२६ रोजी दहागावाच्या हद्दीतील मोकळया मैदानाच्या बाजुस असलेल्या शेतात कुजलेल्या स्थितीत हात, पाय, डोळे बांधलेले व अंगावर ठिक ठिकाणी वार असलेला एक अनोळखी पुरुषाचा मृत देह मिळुन आल्याने अज्ञात इसमाविरुध्द वाशिंद पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. २०६/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), २३८ अन्वये दिनांक २७/०५/२०२६ रोजी १८:५८ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मा. श्री डॉ. विनयकुमार राठोड,पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन तातकाळ गुन्हयांचे घटनास्थळी भेट दिली. व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, श्री संदिप गिते यांना सदर गुन्हयांचे अनुषंगाने तपासकामी वेगवेगळी पथक तयार करुन गुन्हयांचा समांतर तपास करुन लवकरात लवकर गुन्हा उघकीस आणण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले.

पोलीस निरीक्षक श्री संदीप गिते, स्थानिक गुन्हे शाखा यांनी अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे वेगवेगळी पथके तयार करुन त्यांना तांत्रिक विश्लेषण,सीसीटीव्ही फुटेज तपासणी व लगतच्या जिल्हयातील मनुष्य मिसींग व अपहरणाच्या गुन्हयांची माहिती गोळा करणे करीता रवाना केली. तपास पथकाने मयताच्या वर्णनाशी मिळती जुळते वर्णन असलेल्या मिसींग वेगळया काढुन सदर माहितीचे तांत्रीक विश्लेषन केले तसेच मयत व्यक्तीची चप्पल, अंगावरील कपडे यावरुन साकीनाका पोलीस ठाणे येथील मिसींग इसम नामे **शमशाद अली वारीश अली वय ३५ वर्षे, रा.काजुपाडा,कुर्ला (प)** अशी असल्याची ओळखली पटली. तांत्रीक विश्लेषणावरुन आरोपीत **सय्यद हसन सय्यद मेहबुब बादशहा, वय ३८ वर्षे, रा.मुंब्रा ठाणे** व आरोपीत **समीर अब्दुल करीम कल्याणकर, वय ४३ वर्षे, रा. माहिम, मुंबई** यांचेवर संशय बळावल्याने त्यांना ताब्यात घेतले. त्यांचेकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता,मयत याने आरोपीत क्र. १ सय्यद हसन सय्यद मेहबुब बादशहा यास उसने पैसे दिले होते. सदरचे पैसे मयतास परत देत नसल्याने मयताने आरोपीताकडे पैशाचा तगादा लावत होता. त्याचा आरोपीस राग येवुन आरोपी क्र. **२ समीर अब्दुल करीम कल्याणकर, वय ४३ वर्षे**, याच्या मदतीने मयतास दहागाव,वाशिंद येथे फुस लावुन आणले व त्याचे हात,पाय, बांधुन धारदार हत्याराने निघृन खुन केल्याचे उघडकीस आले आहे.

मा.श्री डॉ.विनयकुमार राठोड,पोलीस अधीक्षक,ठाणे ग्रामीण,मा.श्री अनमोल मित्तल,अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक,श्री संदीप गिते,स्थानिक गुन्हे शाखा,ठाणे ग्रामीण यांचे नेतृत्वात पोउनि महेश कदम, पोउनि रोहन शेलार,पोउनि भाऊसाहेब गायकवाड,सफौ प्रकाश साईल,सफौ धनाजी कडव,पोहवा संतोष सुर्वे,पोहवा गोविंद कोळी,पोहवा उमेश ठाकरे,पोहवा हनुमान गायकर, पोहवा सतिष कोळी,पोहवा हेमंत विभुते, पोहवा संदीप तांडेल, पोहवा शशिकांत पाटील, पोहवा दिपक गायकवाड, पोहवा रविंद्र मोरे, पोना योगेश शेळकंदे,पोना जितेंद्र वारके,पोशि स्वप्नील बोडके,पोशि सुरेश धिंदळे सर्व नेमणुक स्थागुशा या पथकाने अहो रात्रौ अथक परिश्रम घेवुन कोणतेही धागे-दोरे नसतांना ४८ तासाच्या आता गुन्हा उघडकीस आणुन उल्लेखनिय कामगीरी केली आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि गोविंद पाटील,वाशिंद पो. ठाणे हे करीत आहेत.